गोपनीय परिपत्रक.
------------

CR1969072322

क्रमांक कॉन/ २१.आर्.-३४
पुणे, दिनांक २३-७-१९६९.

विषय- गटबांधणीचे काम हे सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे वैयक्तिक काम असल्याने त्याबाबत करावयाचे पूर्ततेबाबत...

या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक सम दिनांक २-१-१९६७ अन्वये असे स्पष्ट आदेश काढण्यात आले होते की, गटबांधणीचे काम हे सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे वैयक्तिक काम असून कोणत्याही परिस्थितीत ते काम हाताखालील कर्मचा-यांकडे सोपवू नये. तसेच याबाबत येणा-या संभाव्य लाचलुचपत व इतर तक्रारींना आळा घालण्याचे दृष्टीने प्रत्येक सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी गटबांधणीचे काम स्वतः केल्याबद्दल प्रमाणपत्र योजनेसोबत दृयावे अशाही सूचना वरील परिपत्रकात दिल्या होत्या. असे असूनही जमाबंदी आयुक्त यांच्या असे अनेक वेळा निदर्शनास आले आहे की, सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी जरी वरीलप्रमाणे प्रमाणपत्र दिले असले तरी प्रत्यक्षांत हे काम एकत्रीकरण आस्थापने वरील निमतानदार, मंडळ निरिक्षक अथवा भूमापक यांचेकडे सोपविले जाते. सदर काम वर नमूद केलेल्या कर्मचा-यांकडेस सोपविल्यामुळे त्यांत अनेक दोष आढळून येतात व त्या शिवाय अनेक तक्रारीही निर्माण होतात व लांचलुचपतीस वाव मिळतो. अशा त-हेने सदोष योजना झाल्यास त्याबाबत दुरूस्ती योजना तयार कराव्या लागतात. तरी याबाबत परत एकवार सूचना देण्यात येत आहे की, इकडील परिपत्रक क्रमांक सम दिनांक २-१-५७ मधील आदेशांचे काटेकोरपणाने पालन केले जावे.

२/- त्याचप्रमाणे जमाबंदी आयुक्त यांचे असेही निदर्शनास आले आहे की, एकत्रीकरण योजनेच्या प्रसिध्दीकरणावर आलेल्या हरकती अर्जांची चौकशी करण्याचे काम एकत्रीकरण अधिकारी यांचेकडून सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे सोपविण्यात येते व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे समोर घेतलेल्या जाबजबाबांची फक्त रुजवात घेण्यात येते. सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना जमिन एकत्रीकरण कायदूयाचे कलम १९ व २७ खेरीज एकत्रीकरण अधिकारी यांची शक्ती प्रदान केलेली असल्याने हरकती अर्जांची चौकशी त्यांचेवर सोपविणे अवैध आहे. व ते काम एकत्रीकरण अधिकारी यांचे वैयक्तिक काम आहे. याची नोंद घ्यावी. यापुढे हे काम सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे सोपवू नये.

कृ. गो. कानडे

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य,
पुणे

प्रत- उपसंचालक भूमि अभिलेख पुणे/नाशिक/नागपूर व एकत्रीकरण अधिकारी(सर्व)

-२-

यांना माहितीसाठी अग्रेषित.

२/- वरील परिपत्रकाचे परिच्छेद १ मधील आदेश सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचे नजरेस आणावेत. व वरील आदेशांचे पालन काटेकोरपणे होते अगर कसे याची खात्री त्यांच्या तपासणीचे वेळी पडताळून पाहून खात्री करावी.

प्रतिलिपी- रचना व कार्यपध्दती अधिकारी यांना.

कु. २२७९९.